**<u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>**

**नियोजन विभाग/ नागरी दारिद्र्य निर्मूलन व सामाजिक विकास कक्ष**

**जाहीर सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जेंडर बजेट अंतर्गत महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत पात्र महिलांना स्वयंरोजगार करण्याकरिता **घरघंटी/शिलाई मशिन** खरेदीकरिता थेट अर्थसहाय्य देण्याची योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी महिलांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अ)** पात्रतेचे निकष.

१. पिवळया /केशरी शिधापत्रिकाधारक कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रू.१ लाखापेक्षा कमी किंवा दारिद्र्य रेषेखाली असल्यास दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र.

२. वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण ( उच्चतम वयोमर्यादा ६० वर्षे)

**ब) अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे.**

**१) प्राधान्य-१ – १) विधवा. २)परित्यक्ता. ३) घटस्फोटीत. ४) देवदासी. ५) कुटूंबात शारिरीक /मानसिक अपंग असलेल्या महिला. ६) ४० वर्षावरील अविवाहीत. ७) गिरणी कामगार. ८) दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्रधारक कुटूंब.**

१.पिवळया/ केशरी रंगाची रू.१ लाखपेक्षा कमी उत्पन्न नोंद असलेली शिधापत्रिका.

२.आधार कार्ड/पॅन कार्ड/बॅंक पासबुक/फोटो पास/ निवडणूक ओळखपत्र.

३.वयाचा पुरावा- शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म नोंद प्रमाणपत्र.

४.पतीच्या मृत्यूचा दाखला.

५. घटस्फोटाच्या दाव्याचे कागदपत्र.

६.कुटूंबात अपंग सदस्य असल्यास ४० टक्के वा अधिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र.

७. लाभार्थी दारिद्र्य रेषेखाली असल्यास दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र.

८. गिरणी कामगारांसाठी शिधापत्रिकेवरिल गिरणीकामगार शिक्का.

**२) प्राधान्य-२ सर्वसाधारण**

१.पिवळया/ केशरी रंगाची रू.१ लाखपेक्षा कमी उत्पन्न नोंद असलेली शिधापत्रिका.

२.आधार कार्ड/पॅन कार्ड/बॅंक पासबुक/फोटो पास/ निवडणूक ओळखपत्र.

३.वयाचा पुरावा- शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म नोंद प्रमाणपत्र.

**३) ४० टक्के पेक्षा अधिक अपंगत्व असलेली महिलाः** प्राधान्य ०२ मधील कागदपत्रांसह सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र.

**क) परिपूर्ण भरलेले अर्ज स्विकारण्याची कालावधी-** दि.१४.११.२०१७ ते २२.११.२०१७ कार्यालयीन वेळेत.

अंतिम तारखेनंतर आलेल्या/ अपूर्ण/अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसलेल्या इत्यादी अर्जांचा विचार केला जाणार नाही. आवश्यक कागदपत्र व अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे. तो http:portal.mcgm.gov.in येथे Planning Deptt. वर Click केल्यास **“पात्र महिलांना स्वयंरोजगार करण्याकरिता घरघंटी /शिलाई मशिन खरेदीकरिता थेट अर्थसहाय्य देण्याच्या योजनेसाठीचा विहित अर्जाचा नमुना”** येथे Click केल्यानंतर उपलब्ध होईल. तसेच वरील संपूर्ण माहिती व अर्जाचा नमुना विभाग कार्यालयाच्या स्तरावरील “समाज विकास अधिकारी” यांच्याकडे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. सर्व कागदपत्रांसहित पूर्ण भरलेला अर्ज संबंधित विभागाच्या“समाज विकास अधिकारी” यांचेकडे जमा करावा.

अर्ज सादर केला म्हणजे अर्थसहाय्य मंजूर होईलच असे अभिवचन याद्वारे देण्यात येत नाही.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त (नियोजन)**